महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

जा. क्र. : तंशिविकापु/विवि-५/बांधकाम / २०२२/ 3365 दिनांक : 14 JUL 2022

## परिपत्रक

प्रति,
प्राचार्य / संचालक,
या कार्यालयाचे अधिनस्त सर्व शासकीय संस्था

**विषय : शासकीय संस्थामधील इमारत बांधकामाबाबत आढावा घेणेबाबत.**

**संदर्भ :** १. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र.९/तंशिसं/नियोजन/बांधकाम/२०२२/२२९ दिनांक २४ मे २०२२.

उपरोक्त विषयाचे तंत्रशिक्षण संचालनालय मुंबई यांचे प्राप्त पत्रानुसार कळविण्यात येते की, शासकीय संस्थांना इमारत बांधकामाकरीता शासनांमार्फत निधी उपलब्ध करुन दिला जातो. याकरीता संबंधित संस्थाकडून विहीत नमुन्यात बांधकामाचा प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी शासनास सादर केला जातो. शासनाकडून प्रस्तावास प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर इमारत बांधकामाकरीता निधी संबंधित सार्वजनिक बांधकाम विभागाच्या BEAMS प्रणालीवर शासनामार्फत उपलब्ध करुन दिला जातो.

तथापि संचालनालयाच्या अंतर्गत संस्थांमधील इमारत बांधकामाकरीत प्रशासकीय मान्यता बऱ्याच कालावधीपूर्वी दिल्यानंतर व आवश्यकतेनुसार निधी उपलब्ध करुन दिल्यानंतरही बऱ्याच काळापासून संस्थाधील इमारतींचे बांधकाम अपूर्ण असणे, इमारत राहाण्यास अयोग्य असणे, दुरुस्तीची कामे शिल्लक असणे, अपूर्ण इमारत हस्तांतरीत करून घेणे, हस्तांतरीत इमारत वापरात नसणे इ. बाबी निदर्शनास आलेल्या असून सदर बाबी गंभीर आहेत. याकरीता सर्व शासकीय संस्थांमधील इमारतींच्या बांधकामाबाबतचा आढावा घेण्यात येत आहे व याकरिता विभागीय स्तरावर सर्व संस्थाप्रमुखांची बैठक आयोजित करण्यात येणार आहे.

तरी या विभागातील सर्व शासकीय संस्था प्रमुख यांना सुचित करण्यात येते की, संस्थामधील चालू, अपूर्ण, पूर्ण परंतु हस्तांतरण न झालेले, हस्तांतरण झाले परंतु वापरात नसतील अशा सर्व इमारत बांधकामाबाबतची सविस्तर व परिपूर्ण माहिती आवश्यक त्या कारणामिमांसासह व खुलाश्यासह **दि. २०-०७-२०२२** पर्यंत या कार्यालयास सादर करावी.

(डॉ.द.व्यं.जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

सोबत - संदर्भीय पत्र.

प्रत : १ प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना संकेतस्थळावर प्रदर्शीत करण्यासाठी.
२ मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य मुंबई ४००००१

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४२९/४९०,
ई-मेल-desk9@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प.क्र.9/तंशिसं/नियोजन/बांधकाम/2022/२२-e                                    दिनांक :- 13 JUL 2022

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई, पुणे, नाशिक, अमरावती, औरंगाबाद, नागपूर.

विषय — तंत्रशिक्षण संचालनालया अंतर्गत सर्व शासकीय संस्थामधील इमारत बांधकामाबाबत आढावा घेणेबाबत.

तंत्रशिक्षण संचालनालया अंतर्गत सर्व शासकीय संस्थांना इमारत बांधकामाकरीता शासनामार्फत निधी उपलब्ध करुन दिला जातो. याकरीता संबंधित संस्थांकडून विहीत नमुन्यात बांधकामाचा प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी शासनास सादर केला जातो. शासनाकडून प्रस्तावास प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर इमारत बांधकामाकरीता निधी संबंधित सार्वजनिक बांधकाम विभागाच्या BEAMS प्रणालीवर शासनामार्फत उपलब्ध करुन दिला जातो.

तथापि संचालनालया अंतर्गत संस्थांमधील इमारत बांधकामाकरीता प्रशासकीय मान्यता ब-याच कालावधीपूर्वी दिल्यानंतर व आवश्यकतेनुसार निधी उपलब्ध करुन दिल्यानंतरही ब-याच काळापासून संस्थामधील इमारतींचे बांधकाम अपूर्ण असणे, इमारत राहाण्यास अयोग्य असणे, दुरुस्तीची कामे शिल्लक असणे, अपूर्ण इमारत हस्तांतरीत करुन घेणे, हस्तांतरीत इमारत वापरात नसणे इ. बाबी निदर्शनास आलेल्या असून सदर बाबी गंभीर आहेत. याकरीता सर्व शासकीय संस्थांमधील इमारतींच्या बांधकामाबाबतचा आढावा घेणे आवश्यक आहे,

तरी आपणास सुचित करण्यात येते की, आपल्या विभागांतर्गत सर्व शासकीय संस्थांमधील चालू, अपूर्ण, पूर्ण परंतु हस्तांतरण न झालेले, हस्तांतरण झाले परंतु वापरात नसतील अशा सर्व इमारत बांधाकामाबाबतचा आढावा घेण्यात यावा. त्याबाबतचा सविस्तर परिपूर्ण अहवाल आवश्यक त्या कारणमिमांसासह व खुलाश्यासह दि. २५.०७.२०२२ पर्यंत संचालनालयास सादर करावा.

(डॉ. अभय वाघ)
संचालक
तंत्रशिक्षण, म. रा., मुंबई

प्रत : मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव.

तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय
पुणे.
13 JUL 2022
आवक क्र. ६५८५

E:\D9 Data\D Drive\DESK9\बांधकाम आढावा.docx